International Journal of Advance and Applied Research (IJAAR) ISSN – 2347-7075
Peer Reviewed Bi-Monthly Impact Factor –7.328
Vol.9 Issue.3 Jan–Feb- 2022

# बहुलसंस्कृतीवाद आणि भारतीय राष्ट्रवाद

**डॉ. आण्णासाहेब हरदारे**
शिवराज कॉलेज, गडहिंग्लज
annasohardare@rediffmail.com

प्रास्ताविक

आधुनिक राज्यशास्त्रात 'राष्ट्रवाद' आणि 'बहुलसंस्कृतीवाद ' या संकल्पनांना महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. 1980 पासून नागरिकत्वाच्या सिध्दांतामध्ये 'बहुलसंस्कृतीवाद ' हा नवीन विचार पुढे आलेला आहे. लोकशाही शासनपध्दतीच्या नागरिकत्वामध्ये 'बहुलसंस्कृतीवाद ' हा महत्वाचा घटक मानावा लागेल.'बहुलसंस्कृतीवाद ' म्हणजे समाजात एका संस्कृतीऐवजी अनेक संस्कृती असणे होय. कारण कोणत्याही देशाची सांस्कृतिक विविधता विचारात घेऊन त्या समाजातील व्यक्तीची ओळख करून द्यावी. 'बहुलसंस्कृतीवाद ' वाद म्हणजे समाजात विविध समुदायांची समान ओळख असते आणि त्याचबरोबरच प्रत्येक समुदायाची स्वतःची सांस्कृतिक ओळखही कायम राहते. विविध समुदायांना प्रादेशिक स्वायत्तता, नकाराधिकार, प्रतिनिधित्वाची हमी, भाषेचा हक्क प्रदान केले तरच त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न सुटेल, अल्पसंख्याक समुदायांना त्यांची संस्कृती जोपासण्यासाठी विशेष अधिकार देण्यात यावे असा 'बहुलसंस्कृतीवाद्याचा आग्रह आहे. तर राष्ट्रवादात राष्ट्राभिमान, राष्ट्रप्रेम, देशाभिमान असतो. भारताच्या राष्ट्रवादाचा विचार करता. भारतीय राष्ट्रवाद हा बहुलसंस्कृतीवादाचा पायाच असल्याचे दिसुन येते.

संशोधनाचा उद्धेश बहुलसंस्कृतीवाद आणि भारतीय राष्ट्रवाद हा संशोधन पेपर लिहिण्यामागचा उद्धेश पुढील प्रमाणे

१ . बहुलसंस्कृतीवाद संकल्पना समजून घेणे.

२ . भारतातील बहुलसंस्कृतीचे स्वरूप समजून घेणे .

३ .भारतातील राष्ट्रवादा चे स्वरूप समजून घेणे.

४ . बहुलसंस्कृतीवाद आणि भारतीय राष्ट्रवाद यांचा संबंध समजून घेणे .

५ .भारताच्या बहुलसंस्कृतीवाद आणि भारतीय राष्ट्रवाद यांचे योगदान समजून घेणे .

संशोधन पद्धती – सदर शोध निबंधासाठी एतिहासीक संशोधन पद्धतीचा वापर केला असून यामध्ये प्रथम व दुय्यम साधनाचा वापर केला आहे . बहुलसंस्कृतीवाद आणि भारतीय राष्ट्रवाद या विषया संदर्भात प्राथमिक साधने म्हणून इन्सायस्लोपिडिया ,विकिपीडिया ,विकास पिडिया इत्यादी संदर्भ ग्रंथ आणि दुय्यम साधनामध्ये बहुलसंस्कृतीवाद आणि भारतीय राष्ट्रवाद विषया संदर्भातील विविध लेखकांच्या संदर्भ ग्रंथाचा वापर केला आहे .

'बहुलसंस्कृतीवादाचा विकास – नागरिकत्वाच्या सिध्दांतामध्ये 'बहुलसंस्कृतीवाद हा नवा दृष्टीकोण 1980 पासून अस्तित्वात आलेला आहे. नागरिकत्वामध्ये सांस्कृतिक विविधता विचारात घ्यावी. लागते. राज्यातील नागरिकांची समान राजकीय ओळख निर्माण करत असताना त्यांच्यामधील धार्मिक, वांशिक, भाषिक विविधता विचारात घ्यावी लागते. आज

अल्पसंख्यांकाच्या अधिकारांना मळत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे त्यांच्या पारंपरिक अधिकाराचे रक्षण करणे शक्य झाले आहे. लोकशाही समाजातील नागरिकत्ववाद, बहुलसंस्कृतीवाद हा नवा पैलू आढळून येतो. थोडक्यात लोकशाही समाजात विविध समूहांची समान ओळख असते, शिवाय प्रत्येक समूहाची स्वतःची सांस्कृतिक ओळखही कायम स्वरूपी असते. नागरिकत्वाच्या समान हक्कामुळे विविध, वंश, धर्म आणि भाषिक समूहांच्या गरजांची पुर्तता होत नाही. आपण मुख्य प्रवाहापासून बाजूला पडलो आहे. अशी भावना त्यांच्यात निर्माण होते. यातूनच वेगवेगळया नागरिकत्वाची संकल्पना पुढे आली आहे. एखादया गटाच्या समूहाच्या नागरिकांना केवळ व्यक्ती म्हणून नव्हे तर त्या गटाचे सदस्य म्हणून सामावून घेतले जाते. अर्थातच बहुसंख्याकांनी व्यापक दृष्टाकोण स्वीकारून अल्पसंख्यांकांना सामावून घेऊन त्यांना त्यंाचे हक्क प्रदान करावेत. ‘बहुलसंस्कृतीवादामुळे समाजातील अल्पसंख्याक,वंचित लोकांना न्याय मिळवून दिला जाईल. समाजातील स्त्रिया, मुले, विकलांग, दरिद्री लोक यांना अन्य नागरिकांप्रमाणे सोई उपलब्ध जगता यावे यासाठी राज्यघटनेद्वारे त्यांना संरक्षण आणि संवर्धनाच्या सोई उपलब्ध करून देण्याच्या तरतुदी करण्यात आल्या. अर्थात बहुल संस्कृतीमधील अल्पसंख्यांकाना दिलेल्या सोइ-सवलती आणि सेवा प्रत्यक्षात मिळत नाहीत. त्यामुळे ‘बहुलसंस्कृतीवादीमुळे होणारे फायदे वास्तवात दिसून येत नाहीत.

राष्ट्रवाद आणि ‘बहुलसंस्कृतीवाद –

राष्ट्राभिमान किंवा देशाभिमान ही मानवी मनात निर्माण होणारी एक अत्यंत प्रबळ भावना आहे. राज्यातील लोकांत राज्याविषयी आत्मीयतेची भावना निर्माण होणे. राज्याविषयी प्रेम, अभिमान निर्माण होणे यास ‘राष्ट्रीयत्वाची भावना’ असे म्हणतात. आपण जेंव्हा राष्ट्रवादाच्या तत्वज्ञानाचा विचार करतो तेंव्हा राष्ट्र, राष्ट्राभिमान, राष्ट्रेप्रेम ,राष्ट्रक, राष्ट्रीयत्व इत्यादी गोष्टींचा विचार करीत असतो. राष्ट्रातील लोकांत राष्ट्राभिमान कसा निर्माण झाला. राष्ट्रीयत्वाच्या भावनेस कोणते घटक कारणीभूत ठरले, राष्ट्राच्या विकासास कोणत्या गोष्टी उपयुक्त आहेत, व्यक्तिविकासातून राष्ट्रविकास कशा प्रकारे साधता येईल इत्यादीविषयी विचार करणे यास राष्ट्रवादाची विचारप्रणाली असे म्हणता येईल. राष्ट्रवादाची भावना निर्माण होण्यासाठी विविध घटक कारणीभूत असतात. लोकांच्या मनात जी ऐक्याची भावना निर्माण होते तीच राष्ट्रवादाची भावना होय. राष्ट्रभिमान, राष्ट्रप्रेम निर्माण होण्यासाठी लोकांच्या ठिकाणी आस्था, ओढ, प्रेरणा निर्माण होणे आवश्यक असते. थोडक्यात, ज्या प्रमाणात लोकात ऐक्याची, आत्मीयतेची भावना निर्माण होते त्या प्रमाणात राष्ट्रवादाची भावना प्रकट होत असते.

देशप्रेम, देशाभिमान, देशसेवा, देशभक्ती, एकात्मता, ऐक्य, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रहित अशी भावना जेव्हा नागरिकांत प्रकट होते तेव्हा त्यास राष्ट्रीयत्वाची भावना असे म्हणता येईल. ही राष्ट्रीयत्वाची भावना लोकांच्या आचारांतून, विचारांतून आणि कृतीतून प्रकट होते तेव्हा राष्ट्रवाद उदयाला येतो. राष्ट्रवादातून राष्ट्राचे संरक्षण, संवर्धन होवून शकते. त्याबरोबरच राष्ट्रवादातून युध्दे, महायुध्दे होवू शकतात. आक्रमक राष्ट्रवाद (हिटलर, मुसोलिनी) हा साम्राज्यवादाला, प्रोत्साहन देणारा ठरु शकतो. आत्यंतिक राष्ट्रवादामुळे आंतरराष्ट्रीय शांतता, जागतिक ऐक्य, विश्वबंधुत्व, मानवता या गोष्टी धोक्यात येतात. आक्रमक राष्ट्रवादातूनच दोन महायुध्दे झाली. तेव्हा राष्ट्रवादावर मर्यादा घालणे आवश्यक ठरते. राष्ट्रवादाला राज्याच्या क्षेत्रफळाची मर्यादा असते. आंतरराष्ट्रीय संघर्ष, तणाव आणि त्यातून होणारी महायुध्दे टाळण्यासाठीचा आक्रमक राष्ट्रवादावर मर्यादा घालणे भाग पडले आहे. त्यातूनच आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण झालेली आहे. रवींद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु, प्रेसिडेंट केनेडी यांनी राष्ट्रवादावर टीका करुन विश्वबंधुत्व, मानवता आणि आंतरराष्ट्रीय शांतता यांचा पुरस्कार केलेला आहे.

बहुलसंस्कृतीवाद आणि राष्ट्रवादाचे स्वरूप –

बहुलसंस्कृतीवाद ही संकल्पना अभ्यासताना व्यापक दृष्टिकोनातून विचार करावा लागतो. ‘राष्ट्रवाद’ ही संकल्पना संकुचित, विशिष्ट राज्यापुरतीच मर्यादित असते. कारण ज्या संस्कृतीचा परिणाम झालेला आहेत. त्या स्वरुपाचा राष्ट्रवाद प्रकट होत असतो. बहुलसंस्कृतीच्या संकल्पनेत देशामध्ये अनेक संस्कृतीचे लोक राहत असतात. त्यामुळे त्या व्यक्तीला किंवा व्यक्तिसमूहाला आपल्या राज्याची ओळख करुन द्यावी लागते आणि त्याबरोबर स्वतःची ही ओळख करुन द्यावी लागते. उदा. मी भारत देशाचा घटक आहे आणि मलाही अन्य घटकांप्रमाणे वेगळे स्थान, अधिकार दिलेले आहेत. एखादया समुदाय किंवा गटाला आपण सामावून घेतले तर त्यालाही समानतेच्या तत्वानुसार अधिकार प्राप्त झाले पाहिजेत. अमेरिकेच्या राजकीय व्यवस्थेत जे नागरिक परकीय आहेत आणि जे कायमस्वरुपी स्थायिक होण्यासाठी आलेले आहेत. त्यांना सामावून घ्यावे लागेल आणि अन्य समूहांच्या, गटांच्या नागरिकांप्रमाणे अधिकार द्यावे लागतील. समाजातील कोणताही गट किंवा समूह वंचित राहणार नाही.

समानतावाद्यांच्या मते, बहुलसंस्कृतीत अल्पसंख्यांक गटांना, समूहांना समानतेची वागणूक मिळाली पाहिजे. त्यांना कोणत्याही अधिकारापासून वंचित ठेवले जाणार नाही. बहुलसंस्कृतीच्या देषातील सामन्यतः समाज हा विविध गट, समुदाय आणि संस्कृतींचा मिळून बनलेला आहे. राजकीय समाजामध्ये विविध समुदायांना, संस्कृतींना समान स्थान असाावे. प्रत्येक समुदायाचे महत्व वाढावे या दृष्टीने विविध समुदायांना विशेष प्रतिनिधित्वाचे अधिकार असावेत. कायदेमंडळात सांस्कृतिक, वांशिक गटांना, स्त्रीयंाना गरीबांना प्रतिनिधीत्व मिळावे त्यामुळे अल्पसंख्यांक समुदायाचे शोषण थांबेल तसेच त्यांना स्वयंनिर्णयाचा अधिकारही प्राप्त होईल. अशा प्रकारे समाजातील विविध समुदायांना गटांना समान अधिकार दिले तर त्यांचा सर्वांगिण विकास होण्यास मदत होईल.

भारतीय राष्ट्रवाद आणि बहुलसंस्कृतीवाद –

भारतीय राष्ट्रवाद हा धर्मनिरपेक्ष, सहिष्णु आणि सर्वसमावेशक असा असेल येथे सर्व धर्मियांना त्यांचे धार्मिक अधिकार मिळतील. राज्यावर कोणत्याही एका धर्माचा प्रभाव राहणार नाही. अहिंसेच्या आणि मतपरिवर्तनाच्या मार्गाने समाजामध्ये बदल घडवून आणला जाईल. भारतीय राष्ट्रवादाचा आधार संमिश्र अशी भारतीय संस्कृती ही आहे. ही संस्कृती गेली हजारो वर्षे येथे विकसित होत असून या संस्कृतीचे नेहमीच जगातील इतर संस्कृतीशी समन्वय केला आहे. ही सर्वसमावेशक अशी संस्कृती असून ती व्देषावर, हिंसाचारावर आणि परपीडनावर आधारलेली नाही. आधुनिक राष्ट्र म्हणून भारताची निर्मिती अलीकडच्या काळामध्ये झालेली असली तरी भारतामध्ये एक प्रकारचे सांस्कृतिक ऐक्य होते.

भारतीय संविधानाने धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचा पुरस्कार केला असून राज्याला स्वतःचा असा धर्म नाही. कोणत्याही धर्माला येथे विशेष अधिकार नाहीत. भारतीय नागरिकत्व सर्वांसाठी खुले आहे. संविधानाच्या सरनाम्यामध्ये भारत हे प्रजासत्ताक गणराज्य असेल असे म्हटले आहे. सरनामा पुढे असेही सांगता की, संविधानाने भारतीय जनतेला विचार स्वातंत्र्य अभिव्यक्ती स्वातंत्र्य व धर्मस्वातंत्र्य; संधीची आणि दर्जाची समानता; सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय आणि राष्ट्रीय एकता आणि एकात्मता प्रस्थापित करण्यासाठी बंधुता करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. संविधानाने बाकी नागरिकांना व्यापक असे मूलभूत अधिकार प्रदान केले आहेत. हे अधिकार सहा प्रकारचे असून त्यामध्ये समतेचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार, जिवंत राहण्याचा अधिकार, शोषणापासून मुक्त होण्याचा अधिकार, धर्मस्वातंत्र्याचा अधिकार आणि न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार यांचा समावेश होतो. सर्वोच्च न्यायालयाचे असे मत आहे की, कलम 14 (समतेचा अधिकार) कलम 19 ( स्वातंत्र्याचा अधिकार ) व कलम 21 ( जिवंत राहण्याचा अधिकार )हे तीन अधिकार म्हणजे अधिकारांचा सुवर्ण त्रिकोण आहेत. घटनेच्या मार्गदर्शक तत्वांत राज्याने सामाजिक न्यायाची अंमलबजावणी करण्यासाठी कोणकोणती धोरणे अंमलात आणली पाहिजेत, जेणेकरुन येथे समताधिष्ठीत समाज निर्माण होईल याचे मार्गदर्शन केले आहे. सर्वानाच आपला धर्म पाळण्याचा किंवा न पाळण्याचा, धर्माचा प्रचार आणि प्रसार करण्याचा व धार्मिक संस्था उभारण्याचा अधिकार आहे. आपली सांस्कृतिक ओळख कायम ठेवण्याचा अधिकार आहे. केंद्र आणि राज्य यांच्यामध्ये योग्यप्रकारे अधिकारांची वाटणी करणारे संघराज्य, संसदीय लोकशाही आणि न्यायालयीन स्वातंत्र्य ही आपल्या संविधानाची काही वैशिष्टये आहेत. यात स्वातंत्र्य चवळीमध्ये निर्माण झालेल्या प्रगमनशील विचारांचा समावेश करण्यात आलेला आहे. समतेच्या तत्वांच्या अंतर्गत मागास जातींच्यासाठी राखीव जागांची तरतूद करुन सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा मनोदयही व्यक्त करण्यात आला आहे. भारतीय राष्ट्रवादाच्या प्रस्थापित मांडणीच्या विरोधात वेगवेगळे विद्रोही स्वर व्यक्त करण्यात आलेले होते. त्यातील प्रभावी असा जो स्वर होता तो मुस्लिम राष्ट्रवादाचा. ज्या भागात मुस्लिम समाजाचे बहुमत आहे तो भाग एक राष्ट्र म्हणून दिल्यानंतर हा प्रश्न काही प्रमाणात कमी झाला. पण भारतामध्ये शिल्लक राहिलेल्या शेकडा 11 टक्के मुसलमानांच्या एकात्मतेचा प्रश्न उपस्थित/शिल्लक राहिला होता.

धर्मनिरपेक्ष राज्य (धर्मातील राज्य )- भारतीय घटनेच्या समनाम्यात धर्मातील राज्याचा पुरस्कार केलेला आहे. घटनाकारांनी सुरुवातीला धर्मनिरपेक्ष राज्याचा स्पष्ट उल्लेख केलेला नव्हता. परंतु 1976 साली 42 व्या घटनादुरुस्तीने धर्मातील हा शब्द सरनाम्यात योजून धर्मातील राज्य निर्माण करण्याचे उद्दिष्ट स्पष्ट केले आहे. भारतातील कोणत्याही एका धर्माला महत्त्व दिलेले नाही. सर्व धर्मांना समान मानले आहे. भारत हे राष्ट्र पाकिस्तानाप्रमाणे धर्मानिधष्ठीत राज्य नाही. तसेच ते धर्मबाहय राज्यही नाही. भारतात हिंदु, मुसलमान, शीख, बौध्द, जैन, ज्यू, ख्रिश्चन, पारशी इत्यादी विविध धर्माचे लोक राहतात. भारतीय घटनेच्या 25 व्या व 26 व्या कलमात असे स्पष्टपणे लिहिले आहे की शांतता व सुव्यवस्था टिकवून प्रत्येक नागरिकाला आपल्या धर्माचा प्रचार, पालन करता येईल. भारतीय नागरिकाला कोणत्याही धर्माचा आचार व प्रचार करता येईल, परंतु इतर व्यक्तीच्या

धर्माविरुध्द प्रचार करता येणार नाही. सर्व नागरिकांना त्यांचा धर्म, जात, वंश, जन्मठिकाण असा भेद विचारात न घेता समानतेची वागणूक दिली जाईल. अशा प्रकारे भारतीय घटनेने नागरिकांना धार्मिक स्वातत्र्ंय देवून धर्मातीत राज्याचा पुरस्कार केलेला आहे. समता, स्वातंत्र्य व बंधुता- भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत समता, स्वातंत्र्य व बंधुता या लोकशाही तत्वांचा पुरस्कार केलेला आहे. भारतात लोकशाही यशस्वी करावयाची असेल तर सामाजिक, राजकीय, आर्थिक अशा सर्व क्षेत्रांत समता प्रस्थापित झाली पाहिजे. सर्व नागरिकांना समानतेची वागणूक मिळाली पाहिजे. कायदयासमोर सर्व व्यक्ती समान मानल्या गेल्या पाहिजेत, सामाजिक न्याय प्रस्थापित होवून समाजाचा सर्वांगीण विकास साधला पाहिजे. घटनाकारांनी हाच उद्देश गृहित धरुन समतेचे तत्व स्वीकारले आहे. तसेच, व्यक्तिस्वातत्र्ंय घटनेने नागरिकांना समतेच्या हक्काबरोबरच स्वातत्र्ंयाचा हक्क दिलेला आहे. तसेच घटनेने म्हणजे स्वैराचार अशा प्रवृत्तीने नागरिकांनी वागू नये म्हणून घटनेने व्यक्तिस्वातंत्र्यावर काही मर्यादा घातलेल्या आहेत. भारतीय घटनेने सरनाम्यात बंधुतेचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राचे ऐक्य राखणारी बंधुत्वाची भावना नागरिकांत निर्माण झाली पाहिजे. राष्ट्रीय एकात्मता टिकविण्यासाठी बंधुत्वाची भावना आवश्यक आहे. निदान भारतारसारख्या देशात तरी बंधुतेच्या तत्वाची नितांत आवश्यकता आहे. धर्मवाद, जातीवाद, प्रांतवाद, भाषावाद असे वाद कमी करण्यासाठी बंधुत्वाच्या वागणुकीची फार मोठी गरज आहे. म्हणूनच घटनाकरांनी न्या, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या लोकशाही मूल्यांचा घटनेत समावेश केलेला दिसतो. अल्पसंख्याक व मागासवर्गीय लोकांना सवलती -भारतात सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्याच्या उद्दिशाने घटनाकारांनी अल्पसंख्याक जातीजमातीसाठी मागासलेल्या वर्गासाठी काही खास तरतुदी करुन ठेवलेल्या आहेत. विधिमंडळात अनुसूचित जातिजमातीसाठी खास जागा राखून ठेवलेल्या आहेत. लोकसभेत अनुसूचित जातीसाठी 70 आणि अनुसूचित जमातीसाठी 42 जागा राखीव म्हणून ठेवलेल्या आहेत. घटक राज्यांच्या विधिमंडळातही राखीव जागाची तरतूद करुन ठेवलेली आहे. केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या नोक-यांत मागासलेल्या जातिजमातींच्या लोकांना विशेष सवलती देण्यात आलेल्या आहेत. वन्यजातीसाठी घटनेत काही खास तरतुदी केलेल्या आहेत. मागासवर्गीय लोकांच्या आर्थिक व शैक्षणिक विकासांच्या दृष्टीने चौकशी आयोग नेमण्याचा अधिकार राष्ट्रपतीला देण्यात आलेला आहे. चौकशी आयोगाच्या शिफारशी संसदेपुढे ठेवून त्यास मंजूरी घेवून राष्ट्रपती त्यांची अमंलबजावणी करीत असतो. थोडक्यात, अल्पसंख्याक जातिजमातीच्या मागासवर्गीय लोकांचा इतर लोकांबरोबर विकास व्हावा आणि सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा या उद्देशाने घटनाकरांनी काही राखीव जागा व सवलती यांची खास तरतूद घटनेत केलेली आहे. थोडक्यात बहुलसंस्कृतीवाद आणि भारतीय राष्ट्रवादाचा विचार करता बहुलसंस्कृतीवादाची संकल्पना भारतीय राज्यघटनेत व भारतीय राष्ट्रवादात आपल्याला दिसुन येते. विविधतेत एकता आणि बहुलसंस्कृतीवाद हा भारताच्या राष्ट्रवादाच्या एकाच नाण्याच्या दोन बाजु असल्याचे दिसून यते आणि तेच भारतीय लोकशाहीचे सामर्थ्य आहे.

संदर्भ ग्रंथ –

1. Pralay Kanungo – Nation and Identity concepts - IGNOV – Delhi.
2. Austine G – The Indian constitution – Cornerstone of a Nation – Oxford Univercity, N. Delhi.
3. Rajiv Bhargava – Muticulturalism Liberalism and Democracy – London.
4. अशोक चौसाळकर - आधुनिक भारतीय राजकिय विचार प्रवाह आणि अंतः प्रवाह - प्रतिमा प्रकाषन, पुणे.
5. भास्कर भोळे - भारतातील राजकिय विचार प्रवाह - पिंपळापुरे प्रकाषन, औरंगाबाद.